RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ७, अंक १४२] गुरुवार, नोव्हेंबर १८, २०२१/कार्तिक २७, शके १९४३ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३४२**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ नोव्हेंबर, २०२१.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक एमआयएस.१०२१/प्र.क्र.१८५/राउशु-२.—ज्याअर्थी, मुंबई विदेशी मद्य व शुद्ध मद्यार्क ( वाहतुक शुल्क ) नियम, १९५४ मध्ये आणखी सुधारणा करून खालील नियम तात्काळ अंमलात आणले जावेत आणि म्हणून, हे नियम, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५ वा) चे कलम १४३ चे पोट-कलम (३) मधील परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे पूर्वप्रसिद्धीशिवाय तयार करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५ वा) चे कलम १४३ चे पोट-कलम (२) च्या खंड (ब), (फ) व (यु) नुसार तरतूद केल्याप्रमाणे व प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, याद्वारे महाराष्ट्र शासन, मुंबई विदेशी मद्य व शुद्ध मद्यार्क (वाहतुक शुल्क ) नियम, १९५४ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालीलप्रमाणे नियम करीत आहे, ते असे :—

१. या नियमांना, मुंबई विदेशी मद्य व शुद्ध मद्यार्क (वाहतुक शुल्क) (सुधारणा) नियम, २०२१ असे संबोधण्यात यावे.

२. मुंबई विदेशी मद्य व शुद्ध मद्यार्क (वाहतुक शुल्क) नियम, १९५४ मधील नियम ४ मध्ये उपनियम (२) च्या खंड (i) मधील " निर्मिती मूल्याच्या ३०० टक्के " या अंक आणि शब्दांऐवजी " निर्मिती मूल्याच्या १५० टक्के " हे अंक व शब्द समाविष्ट करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**युवराज ब. अजेटराव,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 18th November 2021

*NOTIFICATION*

Maharashtra Prohibition Act.

No. MIS.1021/C.R. 185/EXC-2.—Whereas, the Government of Maharashtra considers that the following rule further to amend the Bombay Foreign Liquor and Rectified Spirit (Transport Fees) Rules, 1954 should be brought into force at once, and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (b), (f), and (u) of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949) and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby, makes the following rules, further to amend the Bombay Foreign Liquor and Rectified Spirit (Transport Fees) Rules, 1954 namely :-

1. These rules may be called the Bombay Foreign Liquor and Rectified Spirit (Transport Fees) (Amendment) Rules, 2021.

2. In rule 4 of Bombay Foreign Liquor and Rectified Spirit (Transport Fees) Rules, 1954, in sub rule (2), in clause (i) for the figures and words, “300 per cent of the manufacturing cost” the figures and words “150 per cent of the manufacturing cost” shall be substituted.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

YUVRAJ B. AJETRAO,
Deputy Secretary to Government.